# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक २२.०५.२०२२ (रविवार)

## फसवणुक

**पोस्टे पारशिवनी** :– अंतर्गत मौजा खंडाळा (मरीयंबी) ७ किमी पश्चिम. दिनांक १९.०५.२२ चे १०.३० वा. दरम्यान, यातील फिर्यादीचे राहते घरी अनोळखी दोन अज्ञात आरोपीने पंचायत समीतीचे बाबु असल्याचे खोटी बतावनी **सांगुन फिर्यादीला १,३४,०००/– रू, चे लोन मंजुर झाल्याचे आमीष दाखवुन एक सोन्याचा गोफ २ तोळे वजनाचा कि.१,०५,३५० /–रू चा माल हात चालाखीने घेवुन गेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रमेश नानक मेंघर वय ६२ वर्ष रा.खंडाळा (मरीयंबी) यांचे रिपोर्टवरून पोस्टे पारशिवनी येथे अनोळखी आरोपीविरूध्द कलम ४२०, १७०, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक पळनाटे पो.स्टे. पारशिवनी मो.न. ७३८७०८६१७८हे करीत आहे.

## शेतातील स्प्रीक्लर पाईप जळुन नुकसान

**पोस्टे काटोल** :– अंतर्गत भाउसाहेब दिग्रस ७ किमी पश्चीम. येथे दिनांक २७.०४.२२ चे ०९.३० ते १०.०० वा दरम्यान. यातील आरोपी व फिर्यादी यांचे शेताला शेत लागुन असुन, यातील आरोपी नामे– वंदना गुलाबराव हनवते रा थातुरवाडा यांनी शेताचा धुरा पेटविला असता ती आग पेट घेत फिर्यादीची शेतात गेली व फिर्यादीचे शेतातील ३० नग स्प्लीन्कर पाईप कि ३८,०००/– रू चे जळुन नुकसान झाले. यावर फिर्यादी यांनी आरोपीस नुकसान भरपाई मागीतले असता टाळाटाळ करीत असल्याने सदर गुन्हा नोद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे–युवराज ज्ञानोबा गोलाइत वय ५२ वर्ष रा भाउसाहेब दिग्रस यांचे रिपोर्टवरून पोस्टे काटोल येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ४३५ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास महीला पोलीस हवालदार पंचफुला मोरे ९०४९६०७११५ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोस्टे काटोल** :– अंतर्गत नगर भवन मेन रोड मार्केटच्या जवळ २ किमी पश्चिम. यातील मृतक दि १५/५/२२ रोजी नगर भवन काटोल हॉल येथे त्याचे साळीचे सगाईकरीता आले असता, छातीमध्ये अचानक दुखु लागल्याने ॲम्बुलन्स करून उपचाराकरीता सेंट्रल रेल्वे हॉस्पीटल नागपुर येथे घेवून गेले असता, डॉ. नी तपासून ०४/४५ वा. वैद्यकीय उपचार पुर्वीच मृत घोषित केल्याने संबधीत कागदपत्र व प्राप्त बयानावरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरतर्फे मपोहवा/ ललिता बन्सोड पोस्टे काटोल यांचे रिपोर्टवरून पोस्टे काटोल येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोहवा/१६२५ प्रभुदास दलाल मो नं ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोस्टे भिवापुर** :— अंतर्गत तास शेत शिवारात ०३ किमी पश्चिम ता. भिवापुर. येथे यातील मृतक नामे— अशोक तुकारामजी डोळस वय ४० वर्षे रा. तास ता भिवापुर हा घराशेजारी जिल्हा परीषद यांच्या पाण्याचा बोडी कडे आपल्या म्हशी घेवुन चारण्याकरीता घेवुन गेले होते, बोडीच्या पाण्यात म्हशी बसुन होत्या व त्या म्हशी पाण्यातुन बाहेर काढण्याकरीता गेले असता, मृतक हे चिखलामध्ये फसुन बोडीच्या पाण्यात बुडुन मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे पो हवा विठ्ठल तितरमारे पोस्टे भिवापुर यांचे रिपोर्टवरून पोस्टे भिवापुर येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो हवा/ विठ्ठल तितरमारे पोस्टे भिवापुर मो.क्र. ९८२३११२३९९ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत शाहानी ट्रेडर्स जवळ, कांद्री कन्हान २ किमी उत्तर. येथे दिनांक २१/५/२०२२ चे ०८.०० वा ते ०८.१५ वा यातील ट्रॅक्टर क्र एम.एच ३—जी —१३६२ च्या चालक नामे— सचिन साहेबराव शिंदे वय २९ रा. संताजी नगर कन्हान हा आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर मध्ये मागील बाजुस पाण्याचे टॅकर घेवुन कांद्री कडुन कन्हान कडे जात असताना वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन तो चालवित असलेल्या ट्रॅक्टर वरील नियत्रंण बिघडल्याने ट्रॅक्टरचे मागील बाजुस असलेले टॅकर ट्रॅक्टर पासुन वेगळे होवुन ट्रॅक्टर हा पलटी झाल्याने त्यास जबर मार लागल्याने जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोलीस नाईक राहुल हेमराज रंगारी पोस्टे कन्हान रिपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे नमुद आरोपी विरूध्द कलम २७९,३०४ (अ) भा.द.वि सह कलम १८४, मो.वा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा तपास पुढील तपास नापोशी मंगेश सोनटक्के मो.न. ९७६७३३१३५६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर.**